RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ३, अंक ३८] मंगळवार, सप्टेंबर १९, २०१७/भाद्र २८, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/लिगल/२०१७/४२१९.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४३(१), ५७(१), ५७(२), ५९ आणि १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून व पूर्व-प्रसिद्धी नंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४" (मुख्य विनियम) मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ.—**(१) या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७", असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **विनियम ५.३ (अ)(२) च्या परंतुकामध्ये सुधारणा.—**मुख्य विनियमांमधील विनियम ५.३ (अ) (२) खालीलप्रमाणे आहे :—

"(२) चार / तीन वायर्स, तीन फेज, फेज वायर आणि न्यूट्रलमध्ये २३० / २४० व्होल्ट्स किंवा फेजेस / लाइन्समध्ये ४०० / ४१५ व्होल्ट्स आणि महानगरपालिका क्षेत्र वगळून सर्व क्षेत्रात करारांतर्गत मागणी ८० केडब्ल्यू / १०० केव्हीए पेक्षा जास्त नसेल, परंतु महानगरपालिका क्षेत्रात ही मर्यादा १५० केडब्ल्यू / १८७ केव्हीए असेल :

परंतु असे की, बहु-विध ग्राहकांच्या बाबतीत ज्यांची त्याच इमारतीमध्ये/जागेमध्ये सिंगल पॉइंट सप्लाय म्हणून करारांतर्गत मागणी १५० केडब्ल्यू / १८७ केव्हीए पेक्षा जास्त असेल तर महानगरपालिका क्षेत्रात ही मर्यादा ४८० केडब्ल्यू / ६०० केव्हीए असेल."

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :—

"(२) चार / तीन वायर्स, तीन फेज, फेज वायर आणि न्यूट्रलमध्ये २३० / २४० व्होल्ट्स किंवा फेजेस / लाइन्समध्ये ४०० / ४१५ व्होल्ट्स आणि करारांतर्गत मागणी १५० केडब्ल्यू / १८७ केव्हीए पेक्षा जास्त नसेल :

परंतु असे की, एकाच इमारतीमधील / जागेमधील बहु-विध ग्राहकांची करारांतर्गत संचित मागणी १५० केडब्ल्यू / १८७ केव्हीए पेक्षा जास्त असेल तर ही मर्यादा ४८० केडब्ल्यू / ६०० केव्हीए असेल."

**अश्वनी कुमार सिन्हा,**

मुंबई,
दिनांक १९ सप्टेंबर २०१७.

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

---

**सूचना**.—"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४", **शासकीय राजपत्रात** दिनांक २० मे, २०१४ रोजी अधिसूचित करण्यात आले आणि या संबंधात ७ ऑगस्ट २०१४ रोजी शुद्धिपत्र अधिसूचित करण्यात आले होते.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION, MUMBAI

*NOTIFICATION*

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Legal/2017/4219.—In exercise of the powers conferred under sections 43(*1*), 57(*1*), 57(*2*), 59 and 181 of the Electricity Act, 2003 and all other powers enabling it in this behalf, and after previous publication, the Maharashtra Electricity Regulatory Commission makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees, Period for Giving Supply and Determination of Compensation) Regulations, 2014 ('the principal Regulations'), namely :—

1. *Short title and commencement*.—(1) These Regulations shall be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees, Period for Giving Supply and Determination of Compensation) (First Amendment) Regulations, 2017.

(2) These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette*.

2. *Amendment to proviso to Regulation 5.3* (*a*) (*ii*).— Regulation 5.3 (a) (ii) of the principal Regulations reads as follows :—

"(ii) Four / Three wires, three phase, 230 / 240 volts between phase wire and neutral or 400 / 415 volts between the phases / lines and contract demand not exceeding 80 kW/ 100 kVA in all areas, except in Municipal Corporation areas where such limit would be 150 kW/ 187kVA :

Provided that in case of multiple consumers with contract demand more than 150 kW / 187 kVA, in the same building / premises as a single point supply in the Municipal Corporation areas where such limit would be 480 kW / 600 kVA."

This shall be substituted by the following :—

"(ii) Four / Three wires, three phase, 230 / 240 volts between phase wire and neutral or 400 / 415 volts between the phases / lines and contract demand not exceeding 150 kW/ 187kVA. :

Provided that in case of multiple consumers in the same building / premises with cumulative contract demand exceeding 150 kW/ 187 kVA, such limit would be 480 kW / 600 kVA."

ASHWANI KUMAR SINHA,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
dated 19th September 2017.

*Note*.—The Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees, Period for Giving Supply and Determination of Compensation) Regulations, 2014 were notified in the *Official Gazette* on 20th May 2014, a *Corrigendum* to which was notified on 7th August 2014.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.